पाटोदा
# संचार
PATODA SANCHAR

E-mail-pat.sanchar@gmail.com संस्थापक संपादक- स्व.विश्वकर्मा डोळसे संपादक-विलास डोळसे

❑पाटोदा/बीड ❑ स्थापना वर्ष ३४ वे, वर्ष १९ वे ❑ अंक १०३ वा ❑ शुक्रवार दि.२४ मे २०२४ ❑ पाने-४ किंमत १ रुपया ❑ पो.र.नं.एलएल/७६.बीड/२०२२-२४ ❑ R.N.I. No.MAHMAR/46359

❑ PATODA/BEED ❑ YEAR 19 th ❑ Issu -103 ❑ Friday 24 May 2024 ❑ Page- 4 Price- Rs.1. ❑Post.Reg.No.L/76/Beed/2022-24 ❑R.N.I. No.MAHMAR/46359

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## खासदार गजानन कीर्तिकर यांची शिंदे गटातून हकालपट्टी करा

मुंबई । लोकसभा निवडणुकीसाठी मुंबईत टप्प्यात मतदान झाले. मराठी टक्का, गुजराती आणि उत्तर भारतीयांच्या मतांवर डोळा ठेवून महायुती आणि महाआघाडीत जोरदार चुरस दिसली. पण आता शिंदे गटातील खदखद पण बाहेर आली आहे. उद्धव ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देऊन आलेले खासदार गजानन कीर्तिकर यांची शिंदे गटातून लागलीच हकालपट्टी करण्याची मागणी आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लिहून कीर्तिकरांना नारळ देण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

# लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत हरवले ४५ हजार कोटींचे मराठवाड्याचे पॅकेज; निवडणुक प्रचारातही कुणी शब्द काढला नाही!

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

मराठवाडा नेहमीच विकासापासून दूर राहिल्याचा आरोप होतो. कधी कोरडा तर कधी ओल्या दुष्काळामुळे मराठवाड्याचा आर्थिक विकास देखील खुंटला आहे. अशात प्रत्येक निवडणुकीपूर्वी मराठवाड्यासाठी वेगवेगळ्या पॅकेजच्या घोषणा केल्या जातात, पुढे नेत्यांना याचा विसर पडतो. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या अमृतमहोत्सवानिमित्त घेतलेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीनंतर राज्य शासनाने मराठवाड्यासाठी ४५ हजार कोटींच्या पॅकेजची घोषणा केली होती. या घोषणेला आता नऊ महिने झाले. मात्र यावर अध्यादेश काढण्याशिवाय काहीही तरतूद झालेली नाही. आता मुख्यमंत्री शिंदे यांनी आज पुन्हा मराठवाडा पाणी टंचाई बैठक घेतली. पण त्यांना जुन्या घोषणांची आठवण करून देताच भर दुष्काळात त्यांनी आश्वासनांचा पाऊस पाडला.

मराठवाड्याच्या विकासासाठी प्रत्येक सरकार मोठमोठ्या घोषणा करतात. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून देखील



अशाच काही घोषणा करण्यात आल्या होत्या. पश्चिमी वाहिन्यांतील पाणी मराठवाड्याला मिळावे, यासाठी स्वतंत्र १४ हजार ४० कोटींची तरतूद केल्याची घोषणा देखील करण्यात आली होती. पण याबाबत कोणतीही ठोस हालचाल झाली नाही. अशात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरूवारी मराठवाड्याच्या पाणी टंचाईवर बैठक घेतली. यावेळी पुन्हा पाणी प्रश्नावर उपाययोजनाच्या घोषणा केल्या.

मराठवाडा तसा नेहमीच विकासापासून दूर राहिला आहे. या मराठवाड्याने राज्याला नवे देशाला अनेक राजकीय नेतृत्व दिले आहे. पण जेव्हा जेव्हा मराठवाड्याचा विकासाचा मुद्दा येतो, त्यावेळी मराठवाड्यात पाऊस पडो ना पडो, आश्वासनाचा पाऊस मात्र नक्की पडतो.

**पावसाळी अधिवेशनानंतर इलेक्शन?**

जलसंपदा विभागाला २१ हजार ५८० कोटी २४ लाख रुपये, तर सार्वजनिक बांधकामाला १२ हजार ९३८ कोटी ८५ लाख रुपयांची घोषणा मंत्रिमंडळ बैठकीत केली. ४५ पैकी ३४ हजार ५१८ कोटी या दोन विभागांसाठीच दिले. उर्वरित १० हजार ४८२ पैकी ७ हजार ८६ कोटी जिल्हानिहाय विविध योजनांसाठी घोषित केले. ३३९६ इतर कामांसाठी आहेत. जलसंपदाचा मागील अनुशेष अद्याप भरून निघालेला नाही. तर बांधकाम विभागाचे सुमारे ५ हजार कोटींचे देणे शिल्लक आहे. पावसाळी अधिवशेनानंतर राज्य सरकार विधानसभा निवडणुकीच्या तयारीत असेल. साधारणत: ऑक्टोबरमध्ये विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागेल. त्यामुळे या पॅकेजची घोषणा ही घोषणाच ठरणार अशी चर्चा आहे.

### जिल्हानिहाय घोषणा

छत्रपती संभाजीनगर २ हजार कोटी
धाराशिव : १ हजार ७१९ कोटी
बीड : १ हजार १३३ कोटी
लातूर : २९१ कोटी
हिंगोली : ४२१ कोटी
परभणी : ७०३ कोटी
जालना : १५९ कोटी
नांदेड : ६६० कोटी
एकूण : ७ हजार ८६ कोटी

### कोणत्या विभागासाठी काय केल्या घोषणा?

जलसंपदा -२१ हजार ५८० कोटी २४ लाख रुपये,
सार्वजनिक बांधकाम-१२ हजार ९३८ कोटी ८५ लाख,
पशुसंवर्धन, दुग्धविकास,मस्त्यव्यवसाय- ३ हजार ३१८ कोटी ५४ लाख,
नियोजन - १ हजार ६०८ कोटी २८
परिवहन - १ हजार १२८ कोटी ६९ लाख,
ग्रामविकास - १ हजार २९१ कोटी ४४ लाख,
कृषी विभाग - ७०९ कोटी ४९ लाख,
क्रीडा विभाग - ६९६ कोटी ३८ लाख,
गृह - ६८४ कोटी ४५ लाख,
वैद्यकीय शिक्षण - ४९८ कोटी ६ लाख,
महिला व बालविकास - ३८६ कोटी लाख,
शालेय शिक्षण - ४९० कोटी ७८ लाख,
सार्वजनिक आरोग्य - ३५.३७ कोटी,
सामान्य प्रशासन- २८७ कोटी,
नगर विकास- २८१ कोटी ७१ लाख,
सांस्कृतिक कार्य- २५३ कोटी ७० लाख,
पर्यटन - ९५ कोटी २५ लाख,
मदत पुनर्वसन - ८८ कोटी ७२ लाख,
वनविभाग - ६५ कोटी ४२ लाख,
महसूल ६३ कोटी ६८ लाख,
उद्योग विभाग- ३८ कोटी,
वस्त्रोद्योग -२५ कोटी,
कौशल्य विकास-१० कोटी,
विधी व न्याय- ३ कोटी ८५ लाख

**अध्यादेश काढले आहेत**

मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयाचे अध्यादेश आले आहेत. अनुदान तरतुदीबाबतही काही निर्णय झाले आहेत. येणाऱ्या काळात तरतूद होऊन कामे मार्गी लागतील, अशी अपेक्षा आहे.

**- मधुकरराजे अर्दड,** विभागीय आयुक्त

# बोगस मतदान; निवडणूक आयोगाने जिल्हाधिकाऱ्यांना मागविले स्पष्टीकरण

**मुंबई । प्रतिनिधी**

बीड लोकसभा मतदारसंघात काही ठिकाणी मतदान केंद्रे बळकावून बोगस मतदान केल्याच्या तक्रारींबाबतचा अहवाल तेथील जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांच्याकडे पाठविला आहे. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने जिल्हाधिकाऱ्यांना आणखी काही मुद्द्यांबाबत स्पष्टीकरण देण्यास सांगितले आहे. आयोगाच्या सूत्रांनी ही माहिती दिली.

बीड मतदारसंघात १३ मे रोजी मतदान झाले होते. भाजपच्या पंकजा मुंडे आणि शरद पवार गटाचे बजरंग सोनवणे यांच्यात मुख्य लढत झाली. या मतदारसंघातील काही मतदान केंद्रे बळकावण्यात आली आणि तिथे मनमानी मतदान घेण्यात आले, अशा तक्रारी आहेत. बजरंग सोनवणे यांनी काही गावांची यादी देऊन तेथे असे प्रकार घडल्याचे म्हटले होते. या संबंधीचे काही व्हिडीओ समाजमाध्यमांमध्ये व्हायरल झालेले होते. या व्हिडीओंची तसेच सोनवणेंच्या तक्रारीची दखल घेत मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने जिल्हाधिकाऱ्यांना अहवाल सादर करण्यास गेल्या आठवड्यात सांगितले होते. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी प्राथमिक अहवाल केला आहे. मात्र, या अहवालातील काही मुद्द्यांवर आणखी स्पष्ट माहिती द्या, असे आदेश मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत, असे सूत्रांनी सांगितले. बीडमध्ये प्रत्यक्ष मतदानावेळी गडबडी झाल्याच्या तक्रारी आहेत, तशा तक्रारी राज्यातील कोणत्याही मतदारसंघातून आलेल्या नाहीत, असे आयोगाने स्पष्ट केले.

आयोगाने मागविलेली स्पष्ट माहिती बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून आल्यानंतर मुख्य अधिकारी कार्यालयाकडून केंद्रीय निवडणूक आयोगाला त्याबाबतचा अहवाल पाठविण्यात येणार आहे.

या अहवालाचा अभ्यास केल्यानंतर बीडमधील काही मतदान केंद्रांवर पुन्हा मतदान घ्यायचे की नाही, याबाबतचा निर्णय केंद्रीय

पान दोन वर


# लाचखोर पोलीस निरीक्षक हरिभाऊ खाडे एसीबीला शरण

**बीड । प्रतिनिधी**

आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षकाने तब्बल एक कोटी रुपयांच्या लाचेची मागणी करत पाच लाख रुपये मध्यस्थांमार्फत स्वीकारले. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर फरार लाचखोर पोलीस निरीक्षक हरिभाऊ खाडे स्वतःहून एसीबी समोर हजर झाले. यानंतर पोलिसांनी खाडे यास अटक केली आहे. त्याचा सहकारी असलेला सहायक फौजदार आर.बी.जाधवर हा अजूनही फरारच आहे.

बीड शहरातील माँ जिजाऊ पतसंस्था प्रकरणात सहकार्य करण्यासाठी आर्थिक गुन्हे शाखेचे





पोलीस निरीक्षक हरिभाऊ खाडे यांनी १ कोटी रुपयांची लाच मागितली होती. तडजोडीअंती १० लाख रुपये देण्याचे ठरले. त्यातील ५ लाख रुपये कुशल जैन याच्या मार्फत स्वीकारले होते. या दरम्यान एसीबीने कारवाई केली होती. या प्रकरणात एसीबीने गुन्हा दाखल केल्यानंतर हरिभाऊ खाडे फरार होता. त्याच्या

पान दोन वर

# सख्ख्या चुलत भावांची जमीनीच्या बांधावरुन हाणामारी; एकाचा मृत्यू

## गेवराई तालुक्यातील मानमोडी येथील घटना

गेवराई । प्रतिनिधी

शेतीच्या वादातून भाऊबंदकीत हाणामारी झाली, यामध्ये गंभीररित्या जखमी झालेल्या तरुण शेतकर्याचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी (दि.२३) सकाळच्या सुमारास गेवराई तालुक्यातील शिवारात घडली. या घटनेने तालुक्यात खळबळ उडाली आहे.

बापुराव रंगनाथ शेळमकर (वय ३५) असे मयताचे नाव आहे.



गेवराई तालुक्यातील मानमोडी येथील रंगनाथ शेळमकर आणि भुजंग शेळमकर या दोघा भावामध्ये शेतीच्या बांधावरून सतत वाद होत होते. सदरील वाद गावांतर्गत बैठका घेवून सरपंच व नागरिकांनी मिटवण्यासाठी बैठक टाकली परंतु यामध्ये देखील तोडगा न निघल्याने त्यांच्यामध्ये बांधावरून सतत वाद होतच राहिले. शेत जमीनही

पान दोन वर

# जिल्ह्यात ४३४ टँकरद्वारे पाणीपुरवठा

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये पिण्याच्णया पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. अनेक वाड्या-वस्त्यांवर टँकरद्वारे पाण्याचा करावा लागत अहे. सद्यस्थितीत जिल्ह्यात ४३४ टँकरने पाण्याचा पुरवठा केला जात आहे.

यावर्षी मराठवाड्यात अत्यंत कमी पाऊस पडल्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. जिल्ह्यातल्या गावांमध्ये पाण्यासाठी लोकांचे हाल होऊ लागलेय. टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. जिल्ह्यात सद्यस्थितीत ४३४ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असून येत्या आठ दिवसांमध्ये आणखी टँकर वाढण्याची वर्तविण्यात येत आहे. पाण्यासाठी काही विहीरीही अधिग्रहीत करण्यात येत आहेत.

# कार्यकारी अभियंत्याच्या घराची झडती; लाखो रुपयांचे घबाड

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात एसीबीकडून दोन वेगवेगळ्या कारवाया झाल्या. यातील एका कारवाईत माजलगाव पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंत्यास लाच घेताना रंगेहाथ पकडले होते. यानंतर त्यांच्या घराची झडती घेतली असता लाखो रुपयांचे घबाड आढळून आहे. यात रोख रकमेसह काही सोन्या-चांदीच्या वस्तू देखील आहेत.

बीडमध्ये एसीबीच्या कारवाईने भ्रष्टाचाराचे धाबे दणाणले आहे. बीडच्या माजलगाव पाटबंधारे विभाग परळी येथील कार्यकारी अभियंता राजेश आनंदराव सलगरकर या अधिकाऱ्याला तलावातील बुडीत क्षेत्रातील गाळ व माती शेतात टाकण्याचा परवानगीसाठी २८ हजाराची लाच घेतांना





बीड एसीबीने रंगेहाथ पकडले आहे. त्यानंतर अंबाजोगाईत येथील किरायाच्या घरी कार्यकारी अभियंता सलगरकर व पंचासमक्ष घर झडती घेतली.

पान दोन वर

# राज्यात मुदतपूर्व विधानसभा निवडणुका घोषित केल्या जाऊ शकतात

**मुंबई । प्रतिनिधी**

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीचे निकाल ४ जून रोजी जाहीर होणार आहेत. या निवडणुकीत सत्ताधारी महायुतीला चांगले यश मिळणार, अशी खात्री राज्याचे विद्यमान महायुती सरकारला असल्याने निकालानंतर याच यशाचा फायदा घेण्यासाठी विधानसभा बरखास्त करून राज्यात मुदतपूर्व विधानसभा निवडणुका घोषित केल्या जाऊ शकतात, असे खात्रीलायक वृत्त सूत्रांकडून मिळाले आहे.

राज्यातील लोकसभा निवडणुकीच्या मतदानाचे पाच टप्पे पूर्ण झाले असून ४ जूनला लोकसभा निवडणुकांचे निकाल जाहीर होणार आहेत. राज्याचे विद्यमान महायुती सरकार व विरोधी महाविकास आघाडीत सरळ सरळ लोकसभा निवडनुकांच्या लढती झाल्या आहेत.

दोन्ही गटांचे, तसेच महाराष्ट्रातील मतदारांचे कोण हारणार कोण जिंकणार याकडे लक्ष लागले असून ४ जूनच्या निकालात महायुतीला ३५ ते ३८ जागा मिळतील, असा प्रशासनाचा गोपनीय अहवाल महायुती सरकारला मिळाला असल्याने सध्याच्या राज्यातील विविध मुद्यातून ढवळलेल्या वातावरणाच्या स्थितीत पार पडलेल्या निवडणुकीत मिळणारे 'हे यशही नसे थोडके' असे महायुतीला वाटते. त्यामुळे विधानसभा लोकसभा निवडणूक निकालानंतर बरखास्त करुन राज्यात मुदतपूर्व विधानसभा निवडणूक घोषित केली जाऊ शकते, असे सूत्रांकडून समजते.

दरम्यान, याच पार्श्वभूमीवर महायुतीतील भाजपा, शिवसेना (शिंदे गट) तर राष्ट्रवादी (अजित पवार गट) तिन्ही पक्ष मिशन विधानसभा म्हणून पक्ष्याच्या बैठकांचे आयोजन केले जाऊ शकते. त्या अनुषंगाने यापैकी अजित पवार गटाची २७ तारखेला मिशन विधानसभा बैठक मुंबई येथे होणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसची महत्वाची बैठक सोमवारी (ता. २७ मे) रोजी सकाळी ११ ते २ यावेळेत गरवारे क्लब हाऊस, मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली व राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, ज्येष्ठ छगन भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत ही महत्त्वाची बैठक पार पडणार आहे.

या बैठकीला मंत्री, आजी-माजी खासदार-आमदार, पदाधिकारी, कार्यकर्त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस व कोषाध्यक्ष शिवाजीराव गर्जे यांनी निमंत्रित केले असल्याची माहिती औरंगाबाद विभागाचे शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी दिली.

# बीड-अहमदनगर महामार्गावर भीषण अपघात; एकाचा जागीच मृत्यू

**बीड । प्रतिनिधी**

बीड-अहमदनगर महामार्गावर काळजाचा थरकाप उडणवारा एक सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. या अपघातात कारचा अक्षरश: चक्काचूर झाला आहे.चालकाचे नियंत्रण सुटल्याने ही घटना घडली. भरधाव कारचालकाचे नियंत्रण सुटले आणि कार थेट शेतात पलटली.या दुर्देवी घटनेत एकाचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती समोर येतेय.ही घटना बीड - अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावर बीड शहराजवळील चऱ्हाटा परिसरात घडली. यात भरधाव कारवरील चालकाचं नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला.

बीड-अहमदनगर महामार्गावर दुर्देवी घटना घडला आहे.या घटनेचा थरारक व्हिडीओ समोर आलाय.यामध्ये कार भरधाव वेगाने येऊन पलटल्याचं आले.काळजाचा थरकाप उडवणारी ही दृश्य या व्हिडीओत पहायला मिळाली.कार चालकाच्या निष्काळजीपणामुळे हा भीषण अपघात बीड-अहमदनगर महामार्गावर घडलाय.

ही थरारक घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. समोर कुठलंही वाहन नसल्याने अनर्थ टळला आहे. मात्र, अवघ्या पाच सेकंदात भरधाव कारचा हा भीषण अपघात झाला आहे.

संचार

## शिक्षण हक्क कायदा; स्थगिती आदेशाचे स्वागत!

शिक्षण हक्क कायदा ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांसाठी असल्याने तो पहिल्या वर्गातील प्रवेशासाठीच कसा लागू होतो व पूर्वप्राथमिक प्रवेशासाठी तो कसा लागू होत नाही, अशी तांत्रिक पळवाट शोधून काही खासगी संस्था भांडत होत्या. बहुतांश शाळांमध्ये पूर्वप्राथमिक प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांनाच पहिल्या वर्गात प्रवेश मिळतो, हे वास्तव लक्षात घेतल्यास ही तांत्रिक पळवाट काढण्यामागचा खासगी संस्थांचा हेतू लक्षात यावा. हा हेतू असफल करण्यासाठी मग सरकारला शाळाप्रवेशाच्या पहिल्या टप्प्यापासून हा कायदा लागू असल्याची स्पष्टता आणावी लागली. खासगी संस्थांचा हेतू शिक्षणातून जास्तीत जास्त नफा कमाविण्याचा असल्याने त्या कायद्यातील शोधण्याचा आटोकाट प्रयत्न करणार हे एकवेळ समजण्यासारखे. मात्र या पळवाटा बंद करून कायद्याची योग्य अंमलबजावणी करण्याची आणि या कायद्याच्या हेतूची पूर्तता करण्याची जबाबदारी ज्या सरकार नामक यंत्रणेवर आहे त्या सरकारनेच कायद्यात नव्या पळवाटा तयार करणारे निर्णय घ्यावेत, याला काय म्हणावे? महाराष्ट्र सरकारने फेब्रुवारीत एक अधिसूचना काढून अशाच नव्या पळवाटा करण्याचा पराक्रम केला आहे. राज्य सरकारने अधिसूचनेद्वारे नियमात बदल करून खासगी व विनाअनुदानित शाळांना आरटीई अंतर्गत वंचित वर्गातील विद्यार्थ्यांना २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश देण्याच्या बंधनातून पळवाट निर्माण करून दिली.

सरकारने बदललेल्या नियमानुसार ज्या खासगी, विनाअनुदानित वा स्वयंअर्थसहायित शाळांच्या एक कि.मी. अंतराच्या परिसरात सरकारी वा अनुदानित शाळा असतील त्या आरटीई अंतर्गत वंचित वर्गातील विद्यार्थ्यांसाठी २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश देणे बंधनकारक नसेल! याचा सोप्या भाषेतील अर्थ हा की, ज्यांच्या एक कि.मी. परिसरात कोणतीही सरकारी व अनुदानित शाळा असेल, अशा सर्व खासगी शाळांना २५ टक्के प्रवेशाच्या बंधनकारक कोट्यातून मुक्त करण्याचा निर्णय सरकारने घेतला. थोडक्यात सरकारच्या या नियमबदलाने आर्थिक दुर्बल विद्यार्थ्यांना २५ टक्के कोट्यात खासगी शाळांमध्ये प्रवेश मिळण्याचा मार्गच बंद झाला होता. राज्य सरकारने कायद्याच्या मूळ हेतूलाच हरताळ फासणारा हा नियम बदल का केला? तर स्वत:वरची आर्थिक जबाबदारी टाळण्यासाठी! आरटीई अंतर्गत खासगी वा विनाअनुदानित शाळांमध्ये जे प्रवेश दिले जातात त्या विद्यार्थ्यांच्या शुल्काची प्रतिपूर्ती करण्याची जबाबदारी राज्य सरकारवर आहे. मात्र, खासगी शाळांना करावयाच्या या प्रतिपूर्तीची राज्यातील थकबाकी २४०० कोटी रुपयांवर गेली आहे. राज्य सरकारकडून ही रक्कम वेळेवर मिळत नाही, अशीच सर्व खासगी शाळांची एकमुखी तक्रार आहे.

ही आर्थिक जबाबदारी नकोशी झाल्याने मग सरकारने स्वत:च कायद्यात पळवाट शोधण्याची शक्कल लढविली व आरटीई कायद्यातील दोन भिन्न तरतुदींचा अकारण संबंध जोडून नियमात करून आपल्या आर्थिक जबाबदारीतून हात झटकण्याची पळवाट शोधून काढली. मात्र, एका खासगी शाळेने आपल्या आर्थिक हिताची जपणूक करण्यासाठी केलेल्या तक्रारीमुळे हे प्रकरण न्यायालयात पोहोचले. या नियम बदलाच्या विरोधात अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभा आणि काही पालकांनीही मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायालयानेही सत्वर त्याची दखल घेतली व सरकारच्या अधिसूचनेला स्थगिती देत १२ जूनपर्यंत सरकारला याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले. यामुळे राज्यातल्या लाखो विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे कारण सध्या राज्यात आरटीई अंतर्गत प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. न्यायालयाने सरकारच्या निर्णयाला स्थगिती दिल्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल पालकांची आपल्या मुलास दर्जेदार शिक्षण मिळावे ही धडपड फलद्रुप होणार आहे. त्यामुळे न्यायालयाने दिलेल्या स्थगिती आदेशाचे करावे तेवढे स्वागत कमीच आहे.

# राजकीय नेत्यांची कर्मे आणि श्रद्धा!

राज्यातील लोकसभा निवडणुकीचे वादळ पुरते शमले आहे. गेल्या राज्यभर प्रचाराचा जो धुरळा उडाला होता तोही आता शांत झाला आहे. राजकीय विरोधक नेत्यांनी निवडणुकीच्या प्रचारात एकमेकांची उणीदुणी काढताना यंदा अत्यंत खालची पातळी गाठल्याचे चित्र ठिकठिकाणी पाहायला मिळाले. अनेक राजकीय नेत्यांनी आपले राजकीय भवितव्य अबाधित राखण्यासाठी पक्षनिष्ठेला तिलांजली देत ज्या पक्षावर तोंडसुख घेण्यात आयुष्य घालवले त्याच पक्षाचा हात धरला. खासदारकी जायला नको म्हणून काही ठिकाणी वडील एका पक्षात आणि पुत्र दुसऱ्या पक्षातून निवडणुकीच्या रिंगणात पाहायला मिळाले. मतदारांना आकृष्ट करण्यासाठी अनेक ठिकाणी परस्परांवर खोटे आरोप करण्यात आले, एकमेकांचे व्यक्तिगत जीवन चव्हाट्यावर आणले गेल्याचेही यंदा बऱ्याच ठिकाणी पाहायला मिळाले. पक्षबदल, युत्या आणि आघाड्या यांमुळे जी नेतेमंडळी मागच्या वेळेस विरोधी पक्षांत ती सरकारमध्ये गेली, तर जी सरकारमध्ये होती ती विरोधी पक्षात गेली. त्यामुळे नेत्यांनी विश्वासाने एकमेकांना खासगीत सांगितलेल्या गोष्टीही यंदा भरसभेत लोकांना ऐकायला मिळाल्या. राजकीय नेत्यांच्या कोलांट्या उड्यांमुळे आणि बदललेल्या पक्षचिन्हामुळे सामान्य मतदारांचा यंदा गोंधळ झालेला पाहायला मिळाला. निवडणूक प्रचारासाठी निवडणूक आयोगाने खर्चाची मर्यादा ठरवून दिली असली, तरी अनेक ठिकाणी उमेदवार उभे असल्याने त्यांच्याकडून ही मर्यादा केव्हाच ओलांडली गेली. मतदारांचा कौल आपल्या दिशेने वळवण्यासाठी साम, दाम, दंड आणि भेद सर्वांचा वापर केला गेल्याचे यंदा पाहायला मिळाले. मतदारांनी आपल्याला मतदान करावे यासाठी अनेक ठिकाणी मतदारांना पैसे, मद्य किंवा भेटवस्तू देण्यात आल्या. काही ठिकाणी तर विरोधक पक्षाच्या सक्रिय कार्यकर्त्यांनाही पैसे देऊन आले, मतदारांना धमकावण्याचे प्रकारही अनेक ठिकाणी



घडले. अनेक ठिकाणी बोगस मतदान झाले. विरोधी पक्षाला मतदान केले म्हणून मारहाणीच्याही घटना घडल्या, लोकांची दिशाभूल व्हावी म्हणून एकाच नावाचे अनेक उमेदवार अपक्ष म्हणून उभे करण्यात आले. जातीच्या आणि धर्माच्या आधारावर मतदान करण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यात आले. काही ठिकाणी भाषिक आणि प्रांतीय वादाची निवडणूक प्रचारातही पडल्याचे पाहायला मिळाले. निवडणूक म्हणजे राजकीय पक्षांसाठी एक युद्धच असल्याने ते जिंकण्याच्या हेतूने नीती आणि नैतिक मूल्यांना पुरते डावलण्यात आले. आम्हीच जनतेचे कसे भले करू शकतो, आमचाच पक्ष कसा जनतेला सुख, समाधान आणि सुरक्षा देऊ शकतो याच्या बढाया प्रचार सभांतून आणि जाहीरनाम्यांतून मारण्यात आल्या.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०

राजकीय पक्षातील अनेक सश्रद्ध असल्याने काहींनी निवडणुकीचा प्रचार सुरु करताना, काहींनी प्रचार थांबल्यानंतर तर काहींनी निवडणूक पार पडल्यानंतर त्यांच्या त्यांच्या उपास्य देवतेच्या किंवा जिल्ह्यातील सुप्रसिद्ध मंदिरांत जाऊन देवतेच्या चरणी लोटांगण घातले. निवडणूक निकालाच्या आदल्या दिवशीही हे चित्र सर्वत्र पाहायला मिळणार आहे. निवडणुकीच्या प्रचारात मतदारांना मायबाप मानून त्यांच्या चरणी लोटांगण घालणारी ही मंडळी निवडणुकीचा निकाल आपल्या बाजूने लागावा, आपले सरकार बहुमताने सत्तेत यावे यासाठी भगवंताच्या चरणी नतमस्तक होताना दिसत आहेत. जगनियंता परमेश्वर नेतेमंडळींच्या या सर्व गोष्टी पाहत आहे. प्रचारात गर्वाने आम्हीच लोकांचे भले करू म्हणणारी ही मंडळी आज जरी त्याच्या चरणी नतमस्तक झाली असली, तरी एकूणच प्रचारात त्यांनी नैतिकता किती ठिकाणी पायदळी जनतेला खोटी आश्वासने किती ठिकाणी दिली, जनतेची फसवणूक कशी केली, स्वार्थासाठी दडपशाहीचा आणि धनाचा वापर किती वेळा केला, एकमेकांवर खोटे आरोप कितींदा केले याची सारी गोळा बेरीज त्या भगवंताच्या ठिकाणी नोंद झाली आहे. त्याचे फळ या मंडळींना आज ना उद्या नक्कीच मिळणार आहे. भगवंताला शरण गेलो म्हणजे माझी सारी धुतली जातील असे होणार नाही. पक्षासह उभे राहिलेल्या उमेदवाराने जनतेसाठी आजतागायत केलेले कार्य, जनतेप्रती त्यांना वाटणारी कणव, जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी त्यांनी वापरलेली प्रचारनिती या सर्वांचा परिणाम निवडणुकीच्या निकालात दिसणारच आहे. भगवंताला जशी त्याला शरण आलेल्याची काळजी असते तशी समस्त जनतेचीही असते त्यामुळे जनतेला जो आवश्यक आहे तो खासदार येणारच आहे. ज्या पक्षामुळे देशाचे कल्याण साधणार आहे अशा पक्षाचे सरकार सुद्धा केंद्रात सत्तेत येणार आहे. मात्र निवडणुकीच्या प्रचारादरम्यान राजकीय स्वार्थासाठी नेतेमंडळींनी जी काही चुकीची कर्मे केली त्याचेही फळ येणाऱ्या काळात त्यांना भोगावे लागणार आहे. भगवंत भक्ताला साहाय्य करत असला, तरी भक्तसुद्धा नीतीने आणि धर्माने वागणारा हवा. कर्माची फळे शिवाचा परमभक्त महाबली रावणाला चुकली नाहीत, भीष्म, द्रोणाचार्य, कृपाचार्य यांची जिथे कर्मसिद्धांतापासून सुटका झाली नाही तिथे राजकीय नेत्यांची काय गत आहे. त्यामुळे राजकीय नेतेमंडळींनी चुकीची कर्मे करून देवाकडे याचना करण्यापेक्षा राजधर्माचे पालन करून भगवंताची कृपा संपादन करावी !

# तरतरी येते तरी दुधाचा चहा, कॉफी आरोग्यास घातकच? काय सांगतात आयसीएमआरची मार्गदर्शक तत्त्वे?

चहा हे भारतात सर्वाधिक सेवन होणारे पेय. जगातील चहा उत्पादकांत भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे. मात्र आपल्याकडील ७० टक्के चहा हा देशांतर्गत मागणी पुरवण्यातच संपतो. चहाला निमित्त कशाला हवे, असे येथे नेहमीच गमतीने म्हटले जाते. सकाळी उठल्यावर तरतरी येण्यासाठी ते रात्रीच्या जेवणानंतर कधीही चहा घेण्याची सवय दिसून येते. मात्र चहाचे सेवन किती करावे, अतिरिक्त सेवनाचे परिणाम काय, त्याचबरोबर भारतात सर्वाधिक प्रचलित असलेला दुधाचा चहा आरोग्यास अपायकारक असतो का या मुद्द्यांचा विचार क्रमप्राप्त ठरतो. कारण भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदने (आयसीएमआर) नुकत्याच जाहीर केलेल्या एका संशोधन दूध घातलेला चहा पिणे टाळावे असा सल्ला देण्यात आला आहे. कॉफीबाबतही असाच इशारा देण्यात आला आहे.



**संशोधन काय सांगते?**

भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (आयसीएमआर) आणि राष्ट्रीय पोषण संस्थेने (एनआयएन) केलेल्या संशोधनामध्ये कॅफिनयुक्त पेयांमध्ये असलेले टॅनिन हे लोह शोषण्यास अडथळा आणू शकते. टॅनिन पोटातील लोहासाठी प्रतिरोधक समजले जातात. ज्यामुळे शरीरात कमतरता आणि अशक्तपणा यांसारखी परिस्थिती उद्भवते. कॉफी आणि चहाचे जास्त सेवन केल्याने रक्तदाब वाढतो आणि ते हृदयाच्या अनियमिततेस कारणीभूत ठरते. चहा आणि कॉफीमधील कॅफिन आपल्या शरीराच्या मध्यवर्ती मज्जासंस्थेला उत्तेजित करते. त्यामुळे त्याचे व्यसन लागते.

**चहा कॉफीमध्ये कॅफिन किती असते?**

सातत्याने व कॉफीच्या प्रत्येक घोटाबरोबर शरीरात कॅफिन जाते. चहा व कॉफीच्या माध्यमातून शरीरात जाणाऱ्या कॅफिनचे प्रमाण आयसीएमआरकडून मोजण्यात आले आहे. त्यानुसार कॉफीच्या १५० मिलीमध्ये ८० ते १२० मिलीग्रॅम कॅफिन असते, तर इन्स्टंट कॉफीमध्ये ५० ते ६५ मिलीग्रॅम इतके कॅफिन असते. त्याचप्रमाणे, चहात ३० ते ६५ मिलीग्राम कॅफिन असते. आयसीएमआरने जारी मार्गदर्शक तत्त्वांमध्ये दररोज ३०० मिलीग्रॅमपेक्षा अधिक कॅफिन सेवन करू नये, अशी शिफारस करण्यात आली आहे.

**मार्गदर्शक तत्त्वे काय सांगतात?**

भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदने (आयसीएमआर) राष्ट्रीय पोषण संस्थेच्या (एनआयएन) माध्यमातून देशात खाण्या- पिण्याच्या आरोग्यदायी सवयींना प्रोत्साहन देण्यासाठी १७ नवीन आहार मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. त्यात चहा आणि कॉफीचे जास्त सेवन करण्याबाबत नागरिकांना सावध राहण्याची शिफारस केली आहे. मार्गदर्शक तत्त्वांमधून वैविध्यपूर्ण आहार आणि शारीरिकदृष्ट्या सक्रिय असण्याचे महत्त्व नागरिकांना पटवून दिले आहे. दुधाचा चहा पिण्याचे टाळावे तसेच जेवणानंतर लगेच चहा, कॉफी आणि इतर कॅफिनयुक्त पेये घेणे टाळावे. जेवणापूर्वी आणि नंतर किमान एक तास चहा पिऊ नये, असा सल्ला देण्यात आला

दुधाशिवाय चहा न पिण्याचे फायदे आहेत का?

दुधाच्या चहाचे सेवन करणे हे अनेकांना आवडत असले तरी दुधाचा चहा आरोग्यास घातक असल्याचे संशोधनातून स्पष्ट करण्यात आले आहे. त्याचवेळी दुधाचा चहा पिण्याचे काही स्पष्ट केले आहेत. दुधाशिवाय चहा प्यायल्याने रक्ताभिसरण सुधारते. हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या मुख्य रक्तवाहिनीचे आजार कमी होतात. तसेच पोटाच्या कर्करोगाचा धोका कमी होतो, असे आयसीएमआरने जाहीर केलेल्या अहवालामध्ये म्हटले आहे. चा शरीरावर कसा होतो परिणाम? उष्माघातापासून कसे राहावे सुरक्षित?

**चहा, कॉफीच्या अतिरिक्त सेवनाचे**

चहा व कॉफीच्या अतिरिक्त सेवनाने शरीरात लोहाची कमतरता निर्माण होते. हिमोग्लोबिन तयार करण्यासाठी लोह खूप महत्त्वाचे आहे. हिमोग्लोबिन संपूर्ण शरीरात ऑक्सिजनचे वाहक म्हणून काम करते. लोहाच्या कमतरतेमुळे एखाद्या व्यक्तीच्या शरीरात रक्तक्षयासारखी (निमिया) परिस्थिती विकसित होते. त्यामुळे शरीर थकवा, दम लागणे, वारंवार डोकेदुखी, हृदयाचे ठोके वाढणे, त्वचा फिकट पडणे, केस अशा समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे दीर्घकाळ आपल्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी जागरूकता आणि चहा, कॉफीचे माफक सेवन करणे आवश्यक असल्याचे आयसीएमआरने आपल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे आयसीएमआरने आपल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये तेल, साखर, मीठ, फळे, भाज्या, संपूर्ण धान्य, मांस आणि मासे यांचेही मर्यादित सेवन करण्याची शिफारस केली आहे. एकंदरीत मार्गदर्शक तत्त्वे कॅफिनशी संबंधित फायदे आणि संभाव्य जोखीम या दोन्हींचा विचार करणाऱ्या आरोग्यदायी आहाराच्या सवयींबाबत मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने जाहीर केली आहेत.

## मधुमेह, हृदय आणि यकृताच्या रुग्णांसाठी आनंदाची बातमी, ४१ औषधे होणार स्वस्त!

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

केंद्र सरकारने जनतेला दिलासा देण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. ४१ आजारांच्या औषधांच्या किमती कमी केल्या जाणार आहेत. मधुमेह, हृदय आणि यकृताशी संबंधित ग्रस्त असलेल्यांसाठी हा दिलासा आहे. सरकारने ६ आजारांसाठी फॉर्म्युलेशनच्या किमतीही निश्चित केल्या आहे. केंद्र सरकारचा हा निर्णय जनतेला मोठा दिलासा मानला जात आहे. हृदय व इतर आजारांबाबत या औषधांच्या किमती कमी कराव्यात, अशी मागणी यापूर्वीही करण्यात आली होती. शहरातील अनेक रुग्णालयांमध्ये त्यांनी मनमानी दर आकारल्याचे अनेकदा उघडकीस आले होते.

फार्मास्युटिकल प्राइसिंग अथॉरिटी आणि फार्मास्युटिकल्स विभागाने या निर्णयाबाबत अधिसूचना जारी केली आहे. यामध्ये अँटिबायोटिक्स, मल्टीव्हिटामिन्स आणि अँटासिड्सशी संबंधित औषधांच्या किमती कमी करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. या निर्णयानुसार औषध कंपन्यांनी त्यांच्या स्टॉकिस्ट आणि डीलर्सना औषधांच्या कमी झालेल्या किमतींची माहिती तातडीने देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. छझझ- १४३ वी बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यात अत्यावश्यक औषधांच्या किमती कमी कराव्यात, जेणेकरून सर्वसामान्यांना दिलासा मिळावा, असा निर्णय घेण्यात आला.

**भारतात १० कोटी लोक मधुमेहग्रस्त**

एका अंदाजानुसार, भारतात सध्या १० कोटी लोक मधुमेहासारख्या आजारांना तोंड देत आहेत. जगभरातील देशांमध्ये भारतीय प्रथम क्रमांकावर आहे. औषधांच्या किमती कमी झाल्याचा फायदा त्यांना मिळणार आहे. गेल्या महिन्यात, फार्मास्युटिकल्स विभागाला ९२३ शेड्यूल्ड औषधांच्या फॉर्म्युलेशनसाठी वार्षिक सुधारित किमती जाहीर करण्यास सांगण्यात आले होते. त्याच वेळी, विभागाने ६५ फॉर्म्युलेशनसाठी सुधारित किरकोळ किमती जारी करण्याबद्दल सांगितले होते.

## पान एक वरुन

### बोगस मतदान; निवडणूक

निवडणूक आयोग घेईल. मतदान केंद्रे बळकावण्याची चौकशी करावी आणि तेथे फेरमतदान घ्यावे, अशी मागणी शरद पवार गटानेआयोगाकडे केली होती.

**आयोगाकडे तक्रार नाही**

अहमदनगरमध्ये खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि शरद पवार गटाचे नीलेश लंके यांच्यात लढत होत आहे. तेथे मतदानानंतर ईव्हीएम मशीन ज्या ठिकाणी ठेवलेल्या आहेत त्या गोदामाची त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था भेदण्याचा एका व्यक्तीने प्रयत्न केला, असा आरोप लंके यांनी केला आहे. त्या ठिकाणी असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याशी छेडछाड करण्याचा प्रयत्न त्या व्यक्तीने असा दावाही लंके यांनी केला आहे. आयोग या आरोपाची स्वतःहून दखल घेणार का, याबाबत उत्सुकता आहे. याविषयी आयोगाकडे अद्याप कोणतीही तक्रार आलेली नाही.

**बारामतीतील 'ती' घटना**

बारामती लोकसभा मतदारसंघात मतदानानंतर ईव्हीएम पुण्यात ज्या ठिकाणी ठेवलेल्या आहेत तेथील सीसीटीव्ही ४५ मिनिटे बंद होते, असा आरोप शरद पवार गटाकडून करण्यात आला मात्र, इलेक्ट्रिक कामांसाठी केबल काढण्यात आल्यामुळे तेथील टीव्हीवर डिस्प्ले नव्हता, परंतु सीसीटीव्ही सुरूच होते, असे स्पष्टीकरण निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी दिले होते.

### लाचखोर पोलीस निरीक्षक

घराची झडती घेतली असता १ कोटी रुपये रोख, साडेपाच किलो चांदी, ९० तोळे सोने, बारामती, इंदापूर, परळी, बीड येथील व्यापारी गाळे आणि फ्लॅट, सहन प्लॉटचे कागदपत्रे करण्यात आले होते.

दरम्यान एसीबीकडून केलेल्या कारवाईनंतर खाडे फरार झाला होता. यांच्या शोधासाठी चार पोलीस पथके तैनात करण्यात आली होती. मात्र रात्री उशिरा खाडे हा स्वतःहून एसीबी समोर हजर झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. यानंतर त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

जाधवर मात्र, अजूनही फरार असून तो देखील शरण येण्याची शक्यता आहे.

### सख्ख्या चुलत भावांची

बांधामुळे काही वर्ष पडीक ठेवण्यात आली होती. गुरुवारी वडील मंडळींचा वाद त्यांच्या मुलामध्ये सुरु झाला. शेतातच बाचाबाची झाल्यानंतर वादाचे रुपांतर हाणामारीत झाले. यातच भुजंग शेळमकर, तिर्थराज शेळमकर, उद्धव शेळमकर यांच्यासोबत बापूराव शेळमकर यांची हाणामारी झाली. ते गंभीर जखमी झाल्याने त्यांना वैद्यकीय उपचारासाठी बीड येथे दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांना मयत घोषित केले. या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

### कार्यकारी अभियंत्याच्या घराची

घराच्या झडतीमध्ये ११ लाख ७८ हजार ४६५ रुपये रोख, ३० ग्रॅम सोन्याचे दागिने ज्याची किंमत अंदाजे २ लाख १० हजार रुपये, ३ किलो ४०० ग्रॅम चांदी ज्याची किंमत अंदाजे २ लाख ७२ हजार रुपये आहे. हा लाखोंचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून याप्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महाराष्ट्रातील आणखी एक प्रकल्प परराज्यात, अंबादास दानवेंकडून सरकारवर आरोप

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात मागील दोन वर्षात म्हणजे मुख्यतः महायुतीच्या सरकारमध्ये राज्यातील प्रकल्प आणि उद्योगधंदे हे परराज्यात गेले आहेत. खासकरून महाराष्ट्रातील उद्योगधंदे हे गुजरातमध्ये गेल्याचा आरोप विरोधकांनी सत्ताधाऱ्यावर केला असताना, आता महाराष्ट्रातील हक्काचा आणखी एक प्रकल्प मध्य प्रदेशमध्ये गेला असल्याचा आरोप विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सरकारवर केलाय. एक्सवरून पोस्ट करत अंबादास दानवे यांनी हा सरकारवर आरोप केलाय.

महाराष्ट्राच्या छत्रपती संभाजीनगर किंवा दाभोळ येथे इंडिया' ही कंपनी ५० हजार कोटींची गुंतवणूक करून इथेन क्रॅकिंग युनिट उभारणार होते. आता हा प्रकल्प महाराष्ट्रात न येता मध्य प्रदेशच्या सिहोर येथे उभारला जाणार आहे. हा प्रकल्प महाराष्ट्राचा विचार करत असताना मध्य प्रदेशात कसा गेला? महाराष्ट्राच्या वाट्याला येणारा रोजगार असा सहज बाहेर कसा गेला? याचं उत्तर उद्योगमंत्री उदय



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी द्यावं, असं दानवेंनी म्हटलंय.

**कुठले प्रकल्प परराज्यात गेले**

राज्यातील टाटा एअरबस, मेडिसीन डिव्हाइस पार्क, सोलर एनर्जी इक्विपमेंट पार्क, वेदांत-फॉक्सकॉन, टेक्स्टाईल पार्क आणि टेक्सटाईल पार्क हे प्रकल्प गुजरातमध्ये गेल्याचा आरोप विरोधकांनी केलाय. हे प्रकल्प गुजरातमध्ये गेल्यानंतर आता छत्रपती संभाजीनगर किंवा दाभोळ 'गेल इंडिया' ही कंपनी उभारणार होती. मात्र ही कंपनी आता मध्य प्रदेशमध्ये उभारली जाणार आहे. त्यामुळं राज्यात प्रकल्प किंवा उद्योग-धंदे उभारण्यास किंवा बेरोजगारांना रोजगार देण्यास सरकारची उदासीनता दिसून येत असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. काही दिवसांपूर्वी 'महानंद' डेअरीचं हस्तांतरण गुजरातमधील मदर डेअरीकडं देण्यात आलं. यावरून विरोधी पक्षनेते विजय यांनी सरकारला धारेवर धरलं होतं. यानंतर आता 'गेल इंडिया' ही कंपनी सुद्धा मध्य प्रदेशमध्ये गेल्यामुळं विरोधक आक्रमक होण्याची शक्यता आहे.

# ६व्या टप्प्यासाठीचा प्रचार समाप्त; ५८ जागांसाठी शनिवारी मतदान

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

लोकसभा निवडणुकीतील सहाव्या टप्प्यासाठीचा प्रचार गुरूवारी सायंकाळी समाप्त झाला. आता त्या टप्प्यात ८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील ५८ जागांसाठी शनिवारी (२५ मे) मतदान होईल. दिल्ली आणि हरियाणातील सर्व जागांचा त्यामध्ये आहे.

देशाची राजधानी दिल्लीतील सर्व ७ जागांचा समावेश असल्याने सहाव्या टप्प्याचे महत्व वाढले आहे. त्या टप्प्यात दिल्लीप्रमाणेच हरियाणातील सर्व १० जागांसाठी मतदान होईल. त्याशिवाय, उत्तरप्रदेशातील १४, पश्चिम बंगाल आणि बिहारमधील प्रत्येकी ८, ओडिशातील ६ आणि झारखंडमधील ४ जागा मतदान प्रक्रियेला सामोऱ्या जातील. जम्मू-काश्मीरमधील अनंतनाग-राजौरी या एका मतदारसंघातही मतदान होणार आहे.

टप्प्यात एकूण ८८९ उमेदवारांचे भवितव्य ठरेल. प्रमुख उमेदवारांमध्ये भाजपच्या ज्येष्ठ नेत्या मनेका गांधी, काँग्रेसचे तरूण नेते कन्हैय्या कुमार, जम्मू-काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती आदींचा समावेश आहे. त्याशिवाय, हरियाणाचे माजी मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर, उद्योगपती नवीन जिंदल आणि माजी न्यायाधीश अभिजित गंगोपाध्याय हे भाजपच्या तिकिटावर नशीब आजमावत आहेत.

लोकसभा निवडणुकीची मॅरेथॉन प्रक्रिया एकूण ७ टप्प्यांत चालणार आहे. सहाव्या टप्प्यानंतर अखेरच्या टप्प्यासाठीचे मतदान शिल्लक राहील. अखेरच्या टप्प्यासाठी १ जूनला मतदान होईल.

# '४ जून रोजी भरपूर पाणी सोबत ठेवा'; किशोर यांचं टीकाकारांना चोख प्रत्युत्तर; भाजपच्या विजयाचा केला दावा

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत आतापर्यंत पाच टप्प्यातील मतदान पार पडले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विजयीरथ रोखण्यासाठी विरोधकांनी कंबर कसली आहे. कसल्याही परिस्थितीत मोदींना तिसऱ्यांदा सत्तेत येण्यापासून रोखण्याचा प्रयत्न विरोधकांकडून होत आहे. याच पार्श्वभूमीवर निवडणूक रणनितीकार प्रशांत किशोर यांच्या एका दाव्याची सर्वाधिक चर्चा आहे. सोशल मीडियावर या दाव्यासंबंधी चांगलीच चर्चा रंगली आहे. प्रशांत किशोर यांनी अलिकडेच दिलेल्या मुलाखतीत भाजप पुन्हा एकदा सत्ता स्थापन करु शकतो असे म्हटल्याने चर्चांना उधान आले.

दरम्यान, किशोर यांनी दिलेल्या मुलाखतीत भाजपच्या २०१९ मधील विजयासारखा दावा केला आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने जितक्या जागा जिंकल्या होत्या त्याच्या या निवडणुकीत भाजप जागा जिंकेल असे म्हटले आहे. याशिवाय, पीएम मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान



झाल्यास त्यांच्या प्राधान्यक्रमाचा अंदाजही त्यांनी वर्तवला आहे. त्यांच्या या वक्तव्यावर विरोधकांनी चांगलाच समाचार घेतला होता.

यातच, किशोर यांनी द वर ट्वीट करत की, '४ जून रोजी भरपूर पाणी प्या....' पाणी पिण्याचा सल्ला देऊन त्यांनी आपल्या टीकाकारांचा समाचार घेतला. ४ जून रोजी लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर होणार आहेत.

किशोर यांनी ट्वीटमध्ये पुढे लिहिले की, पाणी पिणे चांगले असते, कारण ते मन आणि शरीर दोन्ही हायड्रेट ठेवते. या निवडणुकीच्या निकालाचे माझे मूल्यांकन पाहून आश्चर्य वाटते त्यांनी ४ जून रोजी भरपूर पाणी प्यावे.''

२०२१ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचे निकाल आणि त्यापूर्वी त्यांनी केलेले भाकीत लक्षात ठेवण्याचा सल्लाही त्यांनी दिला आहे. पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर होण्यापूर्वी किशोर म्हणाले होते की, 'बंगालमध्ये भाजप तिहेरी आकडा गाठणार नाही. त्यावेळी, अनेक प्रसार माध्यमांनी विजयाचे भाकीत केले होते.' तथापि, किशोर यांच्या दाव्यानुसार निकाल आले होते.

प्रशांत किशोर यांनी नुकतीच एनडीटीव्हीला मुलाखत दिली. या मुलाखतीत ते म्हणाले की, मला वाटते की मोदींच्या नेतृत्वाखालील भाजप पुनरागमन करत आहे. त्यांना गेल्या निवडणुकीत जितक्या मिळाल्या होत्या तितक्याच जागा या निवडणुकीत मिळू शकतात. भाजप सरकारच्या विरोधात लोकांची निराशा किंवा राग असला तरी मोदी सरकार हटवण्याबाबत फारसा राग नाही.''

# पुण्यातील कार अपघाताची न्यायालयीन चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा द्या'' काँग्रेसची मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

पुण्यातील कल्याणीनगर भागात झालेल्या भीषण कार अपघातात दोघांचा मृत्यू झाला असताना कार चालकाची अवघ्या १५ तासात सुटका होते हे अत्यंत गंभीर गरीब आणि श्रीमतांना वेगळे कायदे असल्याचे यातून स्पष्ट दिसत आहे. कार चालक हा बांधकाम व्यावसायिकाचा मुलगा असल्याने त्याची सहज सुटका करण्याचा प्रकार झाला हे अत्यंत आक्षेपार्ह व सामान्यांना न्याय नाकारणारे आहे, पुण्यातील संपूर्ण घटनाक्रम पाहता पुणे पोलिसांनी हे प्रकरण गांभीर्याने हाताळले नसल्याचे स्पष्ट दिसत आहे. पुणेअपघात प्रकरणाची न्यायालयीन चौकशी व दोषींना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून केली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाठवलेल्या पत्रात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, पुणे शहरातील कल्याणीनगर भागात शनिवार दि. १९ मे २०२४ रोजी मध्यरात्री एका भरधाव वेगाने जाणाऱ्या कारने धडक दिल्याने दोघांचा मृत्यू झाला, ही घटना अत्यंत गंभीर आहे. ही कार एक अल्पवयीन मुलगा बेदकारपणे चालवत होतो व मद्यपान करुन आलेला होता हे आतापर्यंतच्या माहितीवरून स्पष्ट झालेले आहे. घटना गंभीर असतानाही या प्रकरणात पुणे पोलिसांनी हलगर्जीपणा केल्याचे उघड झाले आहे. कारचालक मुलगा वेदांत अग्रवाल याची



वैद्यकीय तपासणी केली दोघांचा मृत्यू झाल्याची घटना असतानाही किरकोळ कलमे लावून तातडीने त्याला बाल न्याय मंडळासमोर हजर केले व त्याची जामीनावर सुटका करण्यात आली. दोघांचा जीव घेण्यास कारणीभूत ठरलेल्या त्या आरोपीला जामीन देताना अत्यंत किरकोळ अटी घातल्या होत्या त्यात अपघात या विषयावर निबंध लिहण्यास सांगितले होते, हा हास्यास्पद व चीड आणणारे आहे. जनतेने तीव्र संताप व्यक्त केल्यानंतर त्या मुलाला बालसुधारगृहात व त्याचे वडील बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल यांना पोलीस कोठडीत पाठवण्यात आले आहे.

घटना गंभीर असतानाही १५ तासात आरोपीची सुटका होऊ शकते हे अनाकलनीय आहे. यामुळे काही प्रश्न उपस्थित झाले आहेत. पुणे पोलिसांवर कोणाचा दबाव होता का? ज्यामुळे आरोपी मुलाला वाचवण्याचा केला. आरोपीची वैद्यकीय चाचणी का केली नाही? व तातडीने न्यायालयात हजर करून जामीन मिळावा याची तजवीज केली होती का? अपघातानंतर सत्ताधारी पक्षाचा एक आमदार पोलीस स्टेशनमध्ये होता अशी माहिती समोर आली आहे. त्या आमदाराची या प्रकरणात नेमकी भूमिका काय? कारचालक मुलाच्या वडीलांचे कुख्यात माफियाशी संबंध असल्याचेही समजते, असा आरोप पटोले यांनी केला.

तसेच राज्याचे गृहमंत्री अचानक पुणे पोलीस आयुक्तांच्या कार्यालयाला भेट देतात व पत्रकारांना खुलासे करतात, एवढी तत्परता त्यांनी दाखवण्याचे कारण काय? ज्या बेकायदेशीर घटनांमध्ये भाजपाचा काही संबंध असतो वा इतर संबंध असतात त्या ठिकाणीच फडणवीस तातडीने जातात, हे संशयास्पद आहे. कोरोना काळात रेमडेसिवीर इंजक्शनचा काळाबाजार करणाऱ्याला अटक असता ह्याच गृहस्थाने मध्यरात्री पोलीस स्टेशनमध्ये जाऊन पोलीस कारवाईत हस्तक्षेप केला. परवा भाजपा उमेदवाराने पैसे वाटल्याचे प्रकरण झाले असता तेथेही हे गृहस्थ गेले होते, एरवी ते कोणतेच प्रकरण गांभिर्याने घेत नाहीत. मग याच प्रकरणात एवढी तत्परता का? या प्रकरणात पुण्याचे पालकमंत्री मात्र कुठेच दिसत नाहीत हेही आश्चर्याचे आहे, असेही पटोले म्हणाले.

# 'ईव्हीएम'मध्ये घोटाळा केला तर बघाच, मुख्य निवडणूक आयुक्तांना माजी मंत्र्याची धमकी

**नागपूर । प्रतिनिधी**

राज्यासह देशभरात पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात ४८ पैकी ४० जागा या महाविकास आघाडीला मिळणार आहेत. अशी स्थिती असताना निवडणूक आयोगाने जर ईव्हीएम मशीनमध्ये घोटाळा केला तर आपण त्याचा बदला घेतल्याशिवाय राहणार नाही. 'राज्यातील सर्व मतदारांच्यावतीने मी आपला मर्डर करेल' अशी थेट धमकी राष्ट्रवादी काँग्रेसचे महसूल मंत्री सुबोध सावजी यांनी देशाचे मुख्य निवडणूक आयुक्तांना दिली आहे. त्या संदर्भातील पत्र थेट त्यांच्या दिल्ली कार्यालयाला पाठवलं असल्यानं एकच खळबळ उडाली आहे.

यापूर्वीही दिल्या आहेत धमक्या : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी महसूल मंत्री तथा अकोला आणि बुलढाणा जिल्ह्याचे माजी सुबोध सावजी हे आपल्या विविध अनोखे आंदोलन आणि अधिकाऱ्यांना जनतेच्या प्रश्नांसाठी दिलेल्या धमक्यांसाठी प्रसिद्ध आहेत. संभाजी भिडे गुरुजी जिल्हा परिषदेतील अधिकारी यांच्या मर्डरची देखील त्यांनी मागच्या काळात धमकी दिली होती. आता पुन्हा त्यांनी थेट देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त यांचाच गळा दाबून ठार मारण्याची धमकी दिल्याने एकच खळबळ उडाली आहे.

**तर मी तुमचा गळा घोटेल**

या संदर्भात माजी मंत्री सावजी यांनी थेट मुख्य निवडणूक आयुक्तांनाच पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांनी नमूद केले आहे की, लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रात असलेला मतदाराचा कौल हा महाविकास आघाडी या पक्षांकडेच आहे. या आधारे ४८ जागांपैकी ३८ ते ४० लोकसभेच्या जागा या महाविकास आघाडीच्या येणारचं; परंतु जनतेच्या आणि माझ्या मनात संशय आहे की, आपण ईव्हीएम मशीनमध्ये घोटाळा करून लोकांच्या मतदानाचा लोकशाहीचा गळा घोटणार आहात. असे घडल्यास महाराष्ट्रातील मतदारांच्यावतीनं या अन्यायाच्या विरोधात मी आपला गळा घोटल्याशिवाय राहणार नाही.

वय सध्या ८० वर्षांचे आहे. आता १० किंवा २० वर्ष जगायचे आहे. माझ्या डोळ्यादेखत महाराष्ट्रातील करोडो मतदारांच्या लोकशाही पध्दतीने वापरलेल्या मतदारांच्या अधिकाराचा आपण जर उघड-उघड खून करणार असाल, मुडदा पाडणार असाल तर मी या मतदारांच्या हक्काच्या सन्मानार्थ आपला मुडदा पाडेल किंवा खून करण्यास मागे पुढे पाहणार नाही. लोकशाहीच्या इतिहासात माझे नाव अजरामर करेल, असे माजी मंत्री सुबोध सावजी यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांनी लिहिलेल्या पत्रात नमूद केलं आहे.

# लोकसभा निवडणूक रिंगणातील १२१ उमेदवार निरक्षर; ५३७ उमेदवार २५ ते वर्षे वयोगटातील

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

यावेळची लोकसभा निवडणूक लढवणारे १२१ उमेदवार निरक्षर आहेत. तर, ३५९ उमेदवारांनी इयत्ता पाचवीपर्यंत शिक्षण घेतले आहे. त्याउलट, १९८ उमेदवारांनी डॉक्टरेट पदवी प्राप्त केली आहे.

यावेळच्या निवडणुकीत एकूण ८ हजार ३६० उमेदवार नशीब आजमावत आहेत. त्यापैकी ८ हजार ३३७ उमेदवारांच्या शैक्षणिक छाननी करून असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर) या संस्थेने तपशील जारी केला. त्यानुसार, ६४७ उमेदवारांचे शिक्षण आठवीपर्यंत झाले आहे.

इयत्ता बारावी उत्तीर्ण करणारे १ हजार ३०३ उमेदवार आहेत. तर, १ हजार ५०२ उमेदवार पदवीधारक आहेत. एडीआरने उमेदवारांच्या वयाचाही तपशील दिला. त्यानुसार, ११ उमेदवारांचे वय ८० वर्षांपेक्षा अधिक आहे.

तर, ते ३० वर्षे वयोगटातील ५३७ उमेदवारही निवडणूक रिंगणात उतरले आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करताना उमेदवार त्यासमवेत प्रतिज्ञापत्रही जोडतात. त्या प्रतिज्ञापत्रांची छाननी करून एडीआर ही संस्था उमेदवारांशी संबंधित विविध तपशील उघड करते.

# महाराष्ट्रात २४ तासांत २४ जणांचा बुडून मृत्यू

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात गेल्या २४ तासांमध्ये वेगवेगळ्या घटनांमध्ये तब्बल २४ जणांचा बुडून मृत्यू झाला आहे. जिल्ह्यात दोन, सोलापुर आणि नगरसह अन्य ठिकाणी घडलेल्या दुर्घटनांमध्ये २४ जणांचा मृत्यू झाला आहे. यात उजनी जलाशयात एकूण सहा जणांचा बुडून मृत्यू झाला आहे. या घटनेतील सहाही लोकांचे मृतदेह तब्बल २० तासांनंतर सापडले आहेत. राज्यात घडलेल्या या घटनांमुळे हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी येथे विहिरीत बुडून माय लेकीचा मृत्यू झाला. तर भावली धरणात पोहोण्यासाठी गेलेल्या एकाच कुटुंबातील पाच जणांचा बुडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ज्यामध्ये मामा, दोन मुली, दोन मुले अशा पाच जणांचा समावेश होता.

याशिवाय मंगळवारी संध्याकाळच्या सुमारास उजनी जलाशयातून अवैधरित्या प्रवास करणारी प्रवाशांची उलटल्याने अपघात झाला. या घटनेत तब्बल सहा जणांचा मृत्यू झाला. एनडीआरएफच्या टीमला तब्बल ४० तासांनंतर सहाही मृतदेह बाहेर काढण्यात यश आले.

दुसरीकडे अहमदनगरच्या अकोले तालुक्यातील सुगावमधील रोपवाटीके जवळील पात्रात दोन युवक पोहण्यासाठी प्रवरा नदीत उतरले होते. यावेळी पाण्याचा खोलीचा अंदाज न आल्याने सागर पोपट जेडगुले (वय वर्ष २५) आणि रामदास जेडगुले (वय वर्ष १८) या दोघांचा बुडून मृत्यू झाला.

या घटनेतील सागर जेडगुले याचा मृतदेह गावकऱ्यांच्या मदतीने बाहेर काढण्यात आला. पण आज गुरुवारी सकाळी अर्जून जेडगुले याचा शोध घेण्यासाठी एसडीआरएफची टीम गेली असता नदीतील भवऱ्यात अडकून बोट उलटली. ज्यामध्ये पाच एसडीआरएफच्या जवानांना आपला जीव गमवावा लागला. त्यामुळे या दोन तरुण आणि पाच एसडीआरएफचे जवान अशा जणांचा मृत्यू झाला आहे. या चार घटनांशिवाय गेल्या २४ तासांमध्ये पुणे, बीड आणि नागपुरातही बुडून मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या असल्याची माहिती समोर आली आहे.

# डोंबिवली एमआयडीसीतील केमिकल कंपनीमध्ये भीषण स्फोट; सात ठार, पाच लाखांची मदत जाहीर, राष्ट्रपतींकडून शोक व्यक्त

**ठाणे । प्रतिनिधी**

एमआयडीसीत केमिकल कंपनीमध्ये मोठा स्फोट झाल्याची धक्कादायक घटना घडलीय. स्फोटानंतर कंपनीत भीषण आग लागली. यात सात जणांचा मृत्यू झाला आहे. तर स्फोटात ४८ जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. आगीनंतर धुराचे लोट दूरवरुनही पाहायला मिळत होते. परिसरातील इमारतींच्या काचाही फुटल्याची माहिती आहे. या घटनेमुळं डोंबिवली भागात खळबळ उडाली भीतीचं वातावरण पसरलंय.

डोंबिवली केमिकल स्फोटातील मृतांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. तसंच जखमींच्या उपचाराचा खर्च राज्य सरकार करणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. मुख्यमंत्री शिंदे यांनी रात्री आठ वाजता दुर्घटनास्थळाची पाहणी करत आढावा घेतला.

स्फोटामुळं अनेक वाहनांचं आणि घरांचं नुकसान झालं आहे. तर घटनास्थळी आगीवरती नियंत्रण मिळवीण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. एमआयडीसी अग्निशमन दलाचे जवान दोन फायर वाहनासह उपस्थित आहेत. तसेच डोंबिवली अग्निशमन दलाचे जवान एक फायर वाहनासह उपस्थित कल्याण (पु.) अग्निशमन दलाचे जवान एक फायर वाहनासह उपस्थित आहेत. कल्याण (प.) अग्निशमन दलाचे जवान दोन फायर वाहनासह उपस्थित आहेत. पलावा एमआयडीसी अग्निशमन दलाचे जवान एक फायर वाहनासह उपस्थित आहेत. ठाणे अग्निशमन दलाचे जवान एक हायराईज फायर वाहनासह उपस्थित आहेत.

**पुन्हा प्रोबेसची पुनरावृत्ती**

१६ मे २०१६ रोजी डोंबिवलीत प्रोबेस कंपनीत स्फोट होऊन १२ जणांचा मृत्यू झाला होता. दोनशेच्यावर नागरिक जखमी झाले होते. नागरिकांच्या करोडो रुपयांचं मालमत्तेचं नुकसान झालं होतं. आज तिच पुनरावृत्ती डोंबिवली एमआयडीसी फेज दोन मधील अंबर केमिकल्समध्ये स्फोट होवून झालीय. त्यावेळी प्रोबेस स्फोटाची चौकशी समिती नेमली होती. तो अहवाल जनतेसमोर आणण्यात आलाच नाही आणि त्यातील सूचनांची अंमलबजावणी करण्यात आली नाही. आता पुन्हा तेच तेच समित्या नेमणार हे नक्की. प्रोबेस स्फोटातील नुकसान झालेल्या मालमत्ता धारकांना आणि काही जखमी होऊन जायबंदी झाले होते, त्यांनाही अद्याप नुकसान भरपाई मिळाली नाही.

**नागरिकांचा सुरक्षेचा प्रश्न**

आज झालेल्या स्फोटानं अनेक इमारतींचं नुकसान झालंय. इमारतींना स्फोटाचा वेळी मोठे हादरे बसले. एमआयडीसी फेज मधील म्हात्रे पाडा, रिजेंसी इस्टेट, एमआयडीसी निवासी, सोनार पाडा इत्यादी भागात नुकसान झालंय. सदर भागात काही लोखंडी भागांचे अवशेष पडल्याचं दिसत आहे. स्फोट झालेल्या नागरिक भयभयीत झाले असून असं काही महिन्याच्या अंतरानं दुर्घटना होत असल्यानं नागरिकांचा सुरक्षेचा प्रश्न निर्माण झालाय. एमआयडीसी मधील अती धोकादायक कंपन्या त्वरित येथून हलविण्यात याव्यात, अशी येथील जनतेची मागणी आहे.

**स्फोटाचा हादरा दीड किलोमीटरपर्यंत**

केमिकल कंपनीमध्ये दुपारी एकच्या सुमारास स्फोट झाला. स्फोट झाल्यानंतर जवळच्या कंपन्यांनाही आग लागल्याचं समोर आलं. हा स्फोट इतका भीषण होता की हवेत धुराचे लोळ दिसत होते. आजूबाजूलाही काही दिसत नव्हतं. या स्फोटामुळं दीड किलोमीटर परिसर हादरुन गेला, दीड किलोमीटरमधील गाड्यांच्या आणि बिल्डिंगच्या काचा फुटल्या आहेत. लोक भूकंप आल्याप्रमाणे होते. आजुबाजूच्या परिसरातील एकाही सोसायटीच्या काचा राहिलेल्या नाहीत, सगळ्या काचा तुटून गेल्या आहेत. बॉयलर्सचे जे तुकडे उडाले ते दीड किलोमीटर अंतरावर पडले. हे तुकडे चारचाकी गाड्यांवर पडून गाड्या दबल्या आहेत, अशी माहिती स्थानिक रहिवाशी संजय चव्हाण यांनी दिलीय.

**जवळच्या तीन**

> महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील एका केमिकल फॅक्टरीत बॉयलरचा स्फोट होऊन आगीच्या दुर्घटनेत अनेकांचा मृत्यू झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. मी शोकग्रस्त कुटुंबांप्रती मनापासून संवेदना व्यक्त करते. सर्व जखमींनी लवकरात लवकर बरे होण्याची प्रार्थना मी करते.
>
> **– द्रौपदी मुर्मू, राष्ट्रपती**
>
> डोंबिवली एमआयडीसीत केमिकल कंपनीमध्ये मोठा स्फोट झाला. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांशी बोलणं झालेलं आहे. घटनास्थळी रेस्क्यू टीम , जिल्हाधिकारी , खासदार तिथे पोचले आहेत. त्या ठिकाणी सर्व कंट्रोलमध्ये आहे.
>
> **– एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**
>
> डोंबिवली एमआयडीसीतील अमुदान केमिकल कंपनीत बॉयलरचा स्फोट झाल्याची घटना दुःखद आहे. ८ जण या घटनेत अडकले होते. त्यांना बाहेर आले आहे. जखमींच्या उपचाराची व्यवस्था करण्यात आली असून आणखी रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकार्यांशी माझी चर्चा झाली असून, तेही घटनास्थळी पोहोचत आहेत. एनडीआरएफ, टीडीआरएफ, अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले आहे. जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.
>
> **– देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

**कंपन्यांनाही लागली आग?**

केमिकल कंपनीच्या बॉयलरच्या स्फोटाचा आवाज किलोमीटरपर्यंत ऐकू आला. बॉयलर्सचे तुकडे दीड किलोमीटर अंतरावर पडलेत, सगळ्या सोसायट्यांमधील इमारतींच्या काचा फुटल्या आहेत, अशी माहिती स्थानिकांनी दिली. इतकेच नाही तर स्फोटानंतर ही आग जवळच्या तीन कंपन्यांपर्यंत पसरली आहे. या घटनेतील जखमींवर डोंबिवलीच्या एम्स रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

**लहान स्फोट सुरूच**

डोंबिवली एमआयडीसीतील कंपनीच्या परिसरात धुराचे लोट आगीची तीव्रता इतकी जास्त आहे की, अग्निशमन दलाच्या जवानांना कंपनीच्या गेटवरुनच पाण्याचा मारा करावा लागत आहे. कंपनीत अजूनही रसायनांचे अनेक ड्रम आहेत. आगीमुळं या ड्रमचा स्फोट होत आहे. त्यामुळं आग कमी होताना दिसत नाही. आगीची धग कमी झाल्याशिवाय अग्निशमन दलाला आतमध्ये शिरता येणं शक्य नाही.

# संत बंकटस्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवात स्वामी भक्तांचा रक्तदानाचा विक्रम १३० दात्यांनी केले रक्तदान

## बंकट स्वामी संस्थांना घालून दिला विधायक उपक्रमाचा आदर्श

**बीड । प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र नेकनुर येथे संत बंकट स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवात भाविकांनी रक्तदानाचा विक्रम केला. तब्बल १३० रक्तदात्यांनी रक्तदान करून एक अनोखा संदेश दिला आहे.

वारकरी संप्रदायाचे भक्ती सूर्य गुरुनामगुरु श्री गुरु बंकटस्वामी महाराज पुण्यतिथीनिमित्त श्रीक्षेत्र नेकनूर येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे.. दररोज हजारो भाविक भक्त या उत्सवात ज्ञानदानासह अन्नदानाचां लाभ घेत आहेत. या उत्सवात विधायक उपक्रम हाती घेऊन महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी रक्तदानाचे आवाहन केल्यानंतर स्वामी भक्तांनी रक्तदानासाठी पुढे येत तब्बल १३० रक्तदात्यांनी रक्तदान केले.




सकाळी १० वाजता महंत महाराज इंगळे यांच्या उपस्थितीत रक्तदान शिबिराचे उद्घाटन झाले. पाच वाजेपर्यंत चाललेल्या या शिबिरात उस्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला.. त्या मुळे जिल्हा आरोग्य यंत्रेनेला मोठा हातभार लागला आहे. रक्ताचा तुटवडा असल्याने जिल्हा आरोग्य विभागाकडून रक्तदानाचे रक्तदात्यांना आवाहन केले जात आहे.यातच आध्यात्मिक व्यासपीठावरून रक्तदानाची चळवळ हाती घेत बंकटस्वामी संस्थाने एक वेगळा आदर्श दिल्याच्या भावांना आरोग्य विभागाने व्यक्त केल्या.

अन्नदान द्रव्य दान भूमी दान यापेक्षाही रक्तदान सर्वश्रेष्ठ आहे. जीवनदान देणारे आहे त्यामुळे बंकट स्वामी महाराजांनी देखील विधायक आणि सकारात्मक दृष्टिकोनातून समाजप्रबोधनाची परंपरा चालवली होती त्याच परंपरेला पुढे नेत महंत लक्ष्मण महाराज इंगळे यांनी समाज उपयोगी रक्तदानाचा उपक्रम घेत एक वेगळा आदर्श घालून आहे.

रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी नेकनूर मधील सर्व गणेश मंडळाचे कार्यकर्ते त्याचबरोबर बचत गटाच्या महिला अन्नदान कमिटी व वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. रक्तदात्यांना फळ बिस्किट्स आणि पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

# प्रचारासाठी केलेल्या खर्चामध्ये तफावत आढळून आल्याने बजरंग सोनवणे, पंकजा मुंडे यांना नोटीस

**बीड । प्रतिनिधी**

निवडणुकीच्या काळात सादर केलेल्या खर्चामध्ये तफावत आढळून आल्याने महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ यांनी नोटीस बजावली आहे. त्याचबरोबर महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना खर्चाचे रेकॉर्ड (अभिलेख) सादर करून तपासणी करून घ्यावीत व खर्चात तफावत राहणार नाही, याची दक्षता घेण्याची सूचना केली आहे. तसे आदेश देखील मुधोळ यांनी काढले आहेत.

बीड लोकसभा मतदारसंघात निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांच्या निवडणूक खर्चाच्या रेकॉर्डची तिसरी तपासणी निवडणूक खर्च निरीक्षक सुशांताकुमार बिस्वास यांनी १२ मे रोजी केली होती. या तपासणीमध्ये बजरंग सोनवणे यांनी ७ ते १० मे या कालावधीतील खर्च सादर केला. पहिल्या व दुसऱ्या खर्चातील तफावत अनुक्रमे ५ लाख हजार २९४ व ४ लाख २७ हजार अशी एकुण ९ लाख ५९ हजार २३१ ऐवढी तफावत मान्य केली.

मात्र सदरील रक्कम नोंदवहीमध्ये समाविष्ट करून तशी नोंद घेणे आवश्यक असताना ती नोंद घेतली नाही. त्यामुळे २२ एप्रिल ते १० मे या कालावधीतील खर्चामध्ये छायांकित निरीक्षण नोंदवहीशी तुलना करताना ९ लाख हजार २३१ एवढी तफावत आढळून आली आहे.

खर्च मान्य करूनही तशी नोंद आपल्या निवडणूक खर्च नोंदवहीमध्ये का घेतली नाही ? याबाबत लेखी खुलासा तात्काळ सादर करण्याचा आदेश दिला होता. तसेच तफावत रक्कम निवडणूक खर्चात समाविष्ट करून तपासणीकरिता सादर करण्याची सूचना सोनवणे यांना दिली होती. मात्र सोनवणे यांनी सादर केलेला संयुक्तिक नव्हता. मान्य केलेली तफावतीची एकूण ९ लाख ५९ हजार २३१ रक्कम निवडणूक खर्च नोंदवहीमध्ये समाविष्ट करावी व ही नोंदवही तपासणीसाठी सादर करून तपासणी करून घ्यावी. तफावत राहणार नाही याची दक्षता घ्यावी, अन्यथा निवडणूक खर्चाचा हिशोब ठेवण्यात कसूर केल्याचे गृहीत धरून कारवाई करण्याची सूचना निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी सोनवणे यांना आहे.

१२ मे रोजी तिसऱ्या खर्च तपासणीत ६ ते १० मे या कालावधीतील महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांनी सादर केलेल्या खर्चाची तपासणी करण्यात आली. या कालावधीत १६ लाख ६६ हजार ४३१ एवढ्या रकमेची तफावत दिसून आली. तर ३ मे १० मे या कालावधीत एकूण २० लाख ९४ हजार ४० रकमेची तफावत आढळून आल्याने मुंडे यांना नोटीस बजावली होती. नोटिसीमध्ये दर्शविलेल्या रकमेची तफावत पंकजा मुंडे यांनी मान्य केली. ही रक्कम खर्चात समाविष्ट करून निवडणूक खर्च नोंदवही तपासणीसाठी सादर करून तपासणी करून घ्यावी, असेही म्हटले आहे. दैनंदिन हिशोब नोंदवही अभिलेखे अचूक व नियमितरीत्या सादर करावी, त्यात तफावत राहणार नाही, याची घ्यावी, अशी सूचना पंकजा मुंडे यांना निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी केली आहे.

# श्रीगुरु चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या अमृतवाणीतून दि.१० ते १२ जुनला संत एकनाथ महाराजांचा हरिपाठ विषयावर प्रवचनमाला

**बीड । प्रतिनिधी**

हरीच्या दासा दाही दिशा ! भावे जैसा तैसा हर एक !! श्रीसंत धुंडा महाराज देगलूरकर सेवा प्रतिष्ठान बीड व श्रीमद जनी जनार्दन पाटंगण संस्थान,बीड यांच्या संयुक्त विद्यमाने वै. वे.शा.स. धुंडीराजशास्त्री पाटंगणकर यांच्या स्मृति स्मरणार्थ श्रीगुरु चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या अमृतवाणीतून तीन दिवशीय प्रवचनमाला आनंद, भक्तीमय वातावरणात संपन्न होत असून श्री संत महाराजांचा हरिपाठ याविषयावर होत असलेल्या प्रवचनमालेचा प्रारंभ ज्येष्ठ शु. ४ सोमवार दि.१० जुन ते जेष्ठ शु.६ शके १९४६ बुधवार दि.१२ जुन २०२४ दरम्यान सायंकाळी ०६.०० ते ०८.०० यावेळेत संस्थान थोरले पाटंगण, जुन्या तहसिल मागे, बीड येथे संपन्न होत आहे.



परमपूज्य श्रीगुरु चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या अमृतवाणीतून संपन्न होत असलेल्या संत एकनाथांचा हरिपाठ या विषयावरील तीन दिवशीय प्रवचनमालेस आपण महिला, पुरुष भावीकभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीसंत धुंडा महाराज देगलूरकर सेवा प्रतिष्ठान बीड व श्री जनी जनार्दन संस्थान थोरले पाटंगण, जुन्या तहसीलच्या मागे बीड यांच्या वतीने करण्यात आले असून प्रवचनमालेस येणाऱ्या वाहनांची व्यवस्था किल्ला मैदान परिसर, बलभीम चौक,बीड येथे करण्यात आली असल्याचे आयोजन समितीच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# आज श्री क्षेत्र येथे पुण्यतिथी उत्सवाची सांगता.. ज्ञानसिंधू संदिपान महाराज हासेगावकर यांचे कीर्तन



**बीड । प्रतिनिधी**

वारकरी संप्रदायाचे भक्तिसूर्य श्री गुरु बंकट स्वामी महाराज यांच्या ८० व्या पुण्यतिथी उत्सवात आज दि २४ वार शुक्रवार रोजी सकाळीं १० ते १२ यां वेळेत काल्याचे कीर्तन ज्ञानसिंधू संदिपान महाराज हासेगावकर यांचे होणार आहे. तरी या कीर्तनाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन बंकट स्वामी महाराज संस्थान चे महंत लक्ष्मण महाराज मेंगडे व उत्सव कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे..

# जिल्हा परिषद शिक्षक समायोजन संच मान्यता २०२३-२४ नुसार करण्यात यावे

**बीड । प्रतिनिधी**

शाळेच्या पटसंख्येनुसार देय शिक्षकांशिवाय अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार होत असते. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ संपलेले असून २०२४-२५ जून मध्ये सुरू होत आहे. अशावेळी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील पटसंख्येनुसार अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांचे समायोजन करणे, शैक्षणिक क्षेत्रावर अनिष्ट परिणाम करणारे ठरणार आहे, असे प्रहार शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा बीड चे अध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी स्पष्ट केले आहे.

कारण शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ची पटसंख्या आज बदललेली आहे. तेव्हा तत्कालीन परिस्थिती समोर ठेवून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ सुरू होत असताना आज गरज असलेल्या शाळेवरील शिक्षक देखील अतिरिक्त ठरतील व शिक्षकां अभावी ग्रामीण भागातील शिक्षणावर त्याचा गंभीर दिसून येतील.

संचमान्यता २०२२-२३ साठी ३० नोव्हेंबर २०२२ ही पटसंख्येसाठी निकष दिनांक ठरवुन संचमान्यता करताना शासनाने फक्त व्हॅलिड आधार कार्ड असणारेच विद्यार्थी संख्या गृहित धरण्याचे निश्चित करून संचमान्यता केली होती. मात्र वास्तविक परिस्थिती अशी होती की, आधार कार्ड वरील नाव , जन्मतारीख यातील तफावतीमुळे महाराष्ट्रातील हजारो विद्यार्थ्यांचे आधार कार्ड झालेले नव्हते.

परिणामी विद्यार्थी वर्गात उपस्थित असतानाही संचमान्यतेसाठी त्यांची गणना होऊ शकली नव्हती.

पर्यायाने केवळ एक ते दोन विद्यार्थ्यांचे आधार कार्ड व्हॅलिड नसल्याने कित्येक शिक्षक या संचमान्यतेनुसार अतिरिक्त ठरलेले आहेत. यानंतर संचमान्यता दुरूस्ती साठी देखील सादर होऊन सुधारित देखील झाल्या आहेत.

मात्र यादरम्यान शैक्षणिक वर्ष २०२३-२४ हे संपलेले आहे ३० सप्टेंबर २०२३ ही तारीख आधारभूत मानून करण्यात आलेली लेटेस्ट संचमान्यता शिक्षण विभागाच्या पोर्टल वर दिसून येत आहे असे असताना दोन वर्षांपूर्वीच्या पटसंख्येनुसार शिक्षकांना अतिरिक्त ठरवणे अन्यायकारक असल्याचे असंख्य तक्रारी बीड जिल्ह्यातील शिक्षक बांधवांकडून प्रहार ला प्राप्त झाल्याचे जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी सांगितले आहे.

एवढेच नव्हे तर लातूर जिल्ह्यात संघटना समन्वय समितीने मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे याच विषयाच्या अनुषंगाने दाखल याचिकेवर समायोजन प्रक्रियेचा ३० मार्च २०२४ पर्यंत स्थगिती देखील दिली होती.

ग्रामीण भागातील इंग्रजी शाळांचे फुटलेले पेव, शाळाबाह्य कामे व जिल्हा परिषद शाळा बाबतची शासन,समाज व पालकांची अनास्था यामुळे पटसंख्या मोठ्या प्रमाणात कमी होत चाललेली आहे.

अशा पद्धतीने जुन्या संचमान्यतेनुसार करण्यात येणारे शिक्षक समायोजन जिल्हा परिषद शाळांचे कंबरडे मोडणारी ठरणार असल्याने प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा बीड ने मा. शिक्षण आयुक्त,शिक्षण आयुक्तालय, पुणे,मा. शिक्षण संचालक( प्रा.), पुणे,मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड,मा. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद बीड यांच्याकडे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ वरील संचमान्यता असल्याने व शैक्षणिक वर्ष २०२३-२४ संपलेले असताना पटसंख्येत झालेला बदल पाहता , संचमान्यता २०२२-२३ नुसार समायोजन प्रक्रिया न राबवता शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील ३० सप्टेंबर २०२३ ची पटसंख्येनुसार झालेल्या संचमान्यतेनुसार शिक्षक अतिरिक्त ठरवून समायोजन प्रक्रिया राबवण्याची मागणी करण्यात आली आहे.

# सर्वोत्तम सुख प्राप्ती झालेला ज्ञान शरिरी जीव सिद्ध म्हटला-साध्वी प.पु.प्राचीश्री म.सा.

**बीड । प्रतिनिधी**

केवळ ज्ञानाने सर्व पदार्थांना जाणणारा सशरिरी जीव अर्हता होय आणि सर्वोत्तम सुखप्राप्ती मोक्ष प्राप्ती झालेल्या ज्ञानशरिरी जीव हा सिद्ध म्हटला जातो. अशा मोक्षावस्थेचे वर्णन शब्दांनी करणे शक्य नाही. कारण की तिथे शब्दांची प्रवृत्तीच नसते. तिथे तर्कासही प्रवेश नसतो. कारण तिथे मानस- व्यापार संभव मोक्षावस्था संकल्प विकल्पातीतअसते. अशी मोक्ष अवस्था प्राप्त करण्यासाठी परमेश्वराचीच साधना करावी लागते.असे विचार परमपूज्य प्राचीश्री महाराज यांनी २३ मे रोजी जैन स्थानक महावीर चौक येथे प्रवचन देताना व्यक्त केले.

त्यापुढे म्हणाल्या, या साधनेमध्ये ज्ञान ,क्रिया, कर्माची आवश्यकता पडते ज्ञान मिळवणे हे आवश्यक ठरते. ज्ञानानुसारच माणसाची क्रिया ठरली जाते. क्रिया व त्याचे आचरण हाच मुक्ती मार्ग अर्थात मोक्ष मार्ग ठरू शकतो. यासाठी ज्ञानाचा समन्वय असणे मोक्ष मार्गासाठी सुकर ठरते. केवळ प्रवचनाचे श्रवण केल्याने त्यातून परिवर्तन होत नाही. तर त्यासाठी मिळालेले ज्ञान आचरणात आणणे अगत्याचे ठरते. यावर सांगताना त्यांनी

भगवान बुद्धाचे उदाहरण दिले. भगवान बुद्धाला एका श्रावकाने प्रवचन ऐकूनही परिवर्तन नाही असे सुचवले. त्यावर त्यांनी श्रावस्ती नगरीला भेट देण्याचे सुचवले. ही श्रावस्ती नगरी येथून किती दूर आहे असे त्या श्रावकाने विचारले २४ कोस अंतरावर असणाऱ्या श्रावस्ती नगरीला जाण्याचे त्या श्रावकाने टाळले. पुढील भेटीचे वेळी विचारले असता परिवर्तन न होण्याचे कारण त्यांनी केलेली टाळाटाळ व दिरंगाई दिसून आली. यावरून जर त्या नगरीचे अवलोकन केले नाही तर ती नगरी कशी आहे हे कसे कळून येईल.त्याचप्रमाणे ज्ञानाने जोपर्यंत मोक्षाचे ज्ञान मिळत नाही तोपर्यंत तो सिद्ध ठरणार नाही हेही त्यांनी सांगितले. प्रवचनातून मिळालेले ज्ञान अंतर हृदयात उतरले तर त्यातील अशा आचरणाने माणूस परावर्तनशील होऊन सन्मार्गाला लागतो तर ज्याच्या मनात विवेक वैराग्य आणि भक्ती अधिक असते त्याचेच मन संसारातून निघून ईश्वराकडे झुकते असे साध्वी प्रसन्नाजी महाराज यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

पुढे त्या म्हणाल्या की, भक्ती केल्याशिवाय परमेश्वराची प्राप्ती होत नाही यासाठी परमेश्वरावर श्रद्धाही असायला हवी.जर अंत: करणातून मनोभावे शालीनतेने देवाची पूजा, आर्चा, प्रार्थना केली तर देव प्रसन्न होतो मात्र आज अशी आढळून येत नाही प्रत्येक जण भौतिक सुखाच्या पाठीमागे लागलेला दिसतो आणि त्याची अपेक्षाही भौतिक सुखाची असते. त्या ठिकाणी त्याची श्रद्धा आढळून येत नाही. श्रद्धा ठेवण्यासाठी माणसाच्या अंगी तीन गुणांची अत्यंत आवश्यकता आहे .एक त्याच्या अंगी विवेक असावा तो धैर्याने तोंड देणारा असावा आणि आनंदाने हसतमुख वागून प्रत्येक गोष्टीशी समरस तरच त्याची श्रद्धा ही परमेश्वराच्या ठिकाणी उमळून येते. विवेक न ठेवता सदैव घाई गडबडीत राहून धैर्य न दाखवता शांततेत न राहता घाई करणारा तसेच मनावर समाधान ,संयम न ठेवता आनंदी वृत्तीने न वागणारा श्रद्धेला पात्र ठरत नाही. व तो परमेश्वराच्या सानिध्यात येत नाही. म्हणून शुद्ध अंतकरणाने प्रवचनाचे श्रवण करून आनंदी असावे हे त्यांनी आजच्या मनोगतात बोलून दाखवले.

# सौ.के.एस.के. महाविद्यालयास नॅक समिती २७ मे २०२४ रोजी आजी माजी विद्यार्थी पालक यांच्याशी संवाद साधणार

**बीड । प्रतिनिधी**

येथील सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयास नॅक समितीची चौथी पुनर्रमुल्यांकन तपासणीसाठी नॅक समिती येणार असून महाविद्यालयाचे आजी व माजी विद्यार्थी आणि पालक यांच्याशी दिनांक २७ मे रोजी संवाद साधणार आहेत. तरी या संवाद बैठकीमध्ये नॅक पिअर टीमचे सदस्य आजी माजी विद्यार्थी आणि पालक यांच्या बरोबर महाविद्यालयातील विविध उपक्रमा संबंधीत घटकांवर चर्चा करणार आहेत. जसे की शैक्षणीक,सांस्कृतीक,सामाजिक,उपक्रमा संबंधीत घटकावर चर्चा करणार आहेत. या सोबतच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी महाविद्यालयामध्ये राबवले जाणारे वेगवेगळे उपक्रम यावर देखील चर्चा करणार आहेत. दिनांक २७ व २८ मे रोजी नॅक समिती सोबत बैठकीचे करण्यात आले आहे. महाविद्यालयाची नॅकची संपूर्ण तयारी संस्थेचे अध्यक्ष प्रा.किशोर काळे तसेच नवगण शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ.दीपा क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाली आहे.

तरी महाविद्यालयाकडून सर्व आजी माजी विद्यार्थी, पालक यांना आवाहन करण्यात येते की, आपण या संवाद बैठकीसाठी बहुसंख्येने उपस्थित रहावे.असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील संचालक डॉ.सतिश माऊलगे, आय. क्यु. ए. सी. समन्वयक डॉ.सोनाजी गायकवाड, कमवि उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर, डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वांभर देशमाने यांनी केले आहे.

# सय्यद शोएबचे बारावीच्या परिक्षेत घवघवीत यश

मांजरसुंबा । प्रतिनिधी



येथील सय्यद शोएब तय्यब याने इयत्ता बारावीच्या परिक्षेत ७५.८० टक्के गुण घेऊन यश संपादन केले असून त्याच्या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

तालुक्यातील मांजरसुंबा येथील सय्यद शोएब तय्यब विद्यार्थ्यांने अभ्यासाचे ध्येय समोर ठेवले आणि प्रतिकूल परिस्थितीत मात करुन त्याने ७५.८० गुण मिळवण्याची कामगीरी केली.शोएबने मिळविलेल्या घवघवीत यशा बद्दल त्याचे शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व इतर विविध स्तरातुन अभिनंदन करण्यात येत आहेत.

# विठ्ठल माझा माझा माझा मी विठ्ठलाचा... भजनाने भागवत कथेचा समारोप राधाकृष्णजी महाराज यांना निरोप; भाविक भावविभोर

**बीड । प्रतिनिधी**

विठ्ठल माझा माझा मी विठ्ठलाचा.. मनात भरली पंढरी जाईन म्हणते माहेरी, गोवत्सल महाराज यांच्या सुमधुर आवाजात कथा मंडपातील लोकं भावविभोर झाले. तसेच कथेचा समारोप असल्याने महाराजा निरोप देताना श्रोत्यांना अश्रू अनावर झाले.

श्रीक्षेत्र नेकनुर येथे संत बंकट स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त सुरू असलेल्या भव्य दिव्य भागवत कथेत आज हजारो भाविकांच्या उपस्थितीमध्ये समारोप झाला.. यावेळी व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती श्री ह भ महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, नाना महाराज कदम, सुरेश महराज जाधव, दिनेशानंद महाराज काळे, संतोषजी मानुरकर यांच्यासह सप्ताह कमिटी आणि



अन्नदान कमिटी विश्वस्त मंडळींची उपस्थिती होती.

श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकट स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त राष्ट्रीय भागवत कथा व्यास राधाकृष्णजी महाराज जोधपुरकर यांच्या सू मधुर वाणी तून भागवत कथा श्रवण लाभ मिळाला. यावेळी हिंदी आणि मराठी भाषेचा सुमिलाप भाषा यामुळं खूप आनंद मिळाला. भागवत कथेत कृष्णप्रेम अमृत आणि रास लिला चे वर्णन रुक्मिणी विवाह सोहळा कथा प्रसंग कानाची धनी फिटणारा होता.

यावेळी यां यां पंढरपुरात काय वाजत गाजत... रुक्मिणी झालीया बावरी.. विठू रायची झालीय नवरी.. अशी मराठी भाव राधा कृष्ण महाराजांच्या गोड वाणीतून ऐकायला मिळाले.. कथेच्या व्यासपिठावरून गोपालन, हिंदू धर्म संस्कार, गावातील माणुसकी, नात्यातील विश्वास, प्रेम शब्दाची खरी व्याख्या समर्पण भाव.. गोपी भाव संघशक्ती, निसर्ग प्रेम, यां संदर्भात महाराजांनी समर्पक उदाहरणांनी पटवून दिले..

राधाकृष्णजी महाराज यांच्या कथेचे वेगळेपण हे पोषक आणि समर्पक असलेल्या संगीतावर आहे.. सुंदर संघट लाभल्याने कथामंडपात प्रत्यक्ष गोकुळ निर्माण झाल्याचा भाविकांनी व्यक्त केला.

कथा समारोप झाल्यावर रथामधून महाराजांची व भागवत महाग्रंथांनी मिरवणुक काढण्यात आली.. यावेळी शेकडो तरुण या मिरवणुकीत सहभागी झाले होते. राजस्थान मधून महाराष्ट्रामध्ये येत बंकट स्वामींच्या चरणी भागवत कथा पुष्प समर्पित करताना महाराजानी देखिल धन्यता व्यक्त केली.

# बास्केट बॉल आणि कबड्डी प्रशिक्षण शिबीराचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

येथील सौ.केशरबाई सोनाजीराव ऊर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या वतीने शालेय व महाविद्यालयीन बॉस्केट बॉल आणि कबड्डी खेळाडूंसाठी उन्हाळी प्रशिक्षण शिबीराचे दिनांक १५ मे ते ३० मे दरम्यान आयोजन करण्यात आलेले आहे.

महाविद्यालयाच्या क्रीडागणांवर शहरातील विविध शाळेतील व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण शिबीरामध्ये सहभाग नोंदवला आहे. महाविद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख डॉ.भागचंद बॉल प्रशिक्षक अझहर सिध्दीकी हे ट्रेनिंग देत आहेत. या कॅम्पला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांनी शिबीराचे उदघाटन केले.तसेच संस्थेचे सचिव मा.डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी खेळाडूंना गणवेश वाटप केले.

दरवर्षी होणार्या विविध क्रीडा प्रशिक्षण शिबीरास व ट्रेनिंग कॅम्पसाठी संस्थेच्या उपाध्यक्ष प्राचार्य डॉ.दीपाताई क्षीरसागर यांचे प्रोत्साहन नेहमीच मिळत असते. प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, डॉ.संजय पाटील देवळाणकर,उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर,क्रीडा विभाग प्रमुख डॉ.भागचंद सानप यांनी या शिबीरात जास्तीत जास्त शहरातील विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावे असे आवाहन केले आहे.

हे पत्रक, मुद्रक व प्रकाशक विलास दिगंबरराव डोळसे यांनी कल्पना अक्षर मुद्रणालय पाटोदा (४१४२०४) जि.बीड येथे छापून सायं. दै. पाटोदा संचार कार्यालय, बसस्टॅण्डसमोर पाटोदा जि. बीड येथे प्रसिध्द केले. (संपादक- विलास डोळसे) मोबा.९४२३४७१८३३ (बीड न्याय कक्षेत)

“Printed by Vilas Digambarrao Dolse, Published byVilas Digambarrao Dolse, on behalf of Vilas Digambarrao Dolse, and Printed at Kalpana Akshar Mudranalaya Patoda (414204), Dist. Beed. and published from Eveing Daily Patoda Sanchar in front of Bus Stand, Patoda Dist. Beed Editor Vilas Dolse,(Beed Justice)

# संचार

**जाहिर प्रगटन, कोर्टाची जाहिर नोटीस, जन्म-मृत्युची नोंद, निविदा सुचना, ई टेंडर, नावात बदल, वाढदिवस शुभेच्छा जाहिरात तसेच इतर जाहिराती व बातम्या प्रसिध्दीसाठी संपर्क करा**

**९४२३४७१८३३**

**७०२०६४२६९३**




**दै. संचार च्या अंकाची पीडीएप आपल्या मोबाईलवर मिळविण्यासाठी ९४२३४७१८३३ या मोबाईल नंबरवर मेसेज करा किंवा क्यूआर कोड स्कॅन करा**